पुणे, वार्षिक वर्गणी २०० रुपये, किंमत २० रुपये, मार्च २०२१, खंड १९, अंक १२, पृष्ठे ३२

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३ ● गूढ

५ ● 'कोविड' विरोधातील चिनी लढा

११ ● आनंदी लोकांचा देश

१९ ● 'कोविड', टाळेबंदी आणि बांधकाम क्षेत्र

२५ ● जिकडे - तिकडे


**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**

**वार्षिक वर्गणी २००/- रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/ चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.

वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७
ई-मेलः- ispepune@gmail.com
www.ispepune.org.in

**अर्थबोधपत्रिका**
**खंड १९ (अंक १२) मार्च २०२१**
**संपादक - अभय टिळक**
**सहयोगी संपादक - पराग पोतदार**

*अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

**अर्थबोधपत्रिकेचा हेतू**

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियत-कालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

*अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# गूढ

उकल होण्यास कमालीची अवघड अशी काही गूढे आपल्या भवताली नांदत असतात. 'कोविड-१९' या विषाणूचा उगम हे अशांपैकीच एक. हे चिरंजीव एकाएकीच कोठून अवतरले हे आद्य गूढ. चीनमधील वुहान या शहरात त्याचा जन्म झाला असे निदान सांगितले तरी जाते. समजा, हे खरे असेल तर, हा विषाणू निसर्गनिर्मित की मानवकृत हे पुढचे गूढ. 'कोविड' मानवनिर्मित असेल अथवा आहे असे घटकाभर खरे मानले तरी, अशा उत्पातक विषाणूची निर्मिती करण्याची (कु)बुद्धी त्याच्या निर्मिकाला का व्हावी, हे गूढच. वुहानमधून हा विषाणू अपघाताने बाहेर निसटला की अत्यंत योजनाबद्ध रीतीने त्याच्या वैश्विक प्रसाराची जय्यत व्यवस्था केली गेली, हे आणखी एक गूढ. अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांनी चीनविरुद्ध छेडलेल्या व्यापारी युद्धाची 'कोविड' ही जैविक आघाडी समजायची का, हाही एक गूढप्रश्नच. जागतिक अर्थव्यवस्थेच्या आणि मुख्यतः खुल्या वैश्विक व्यापाराच्या भरधाव आगेकूचीवरच चीनच्या ज्या निर्यातप्रधान विकास धोरणाची आजवरची यशस्वी फलश्रुती निर्भर होती त्या वैश्विक व्यापाराचा कणाच 'कोविड'च्या प्रादुर्भावाद्वारे मोडून टाकण्यासारखा आतबट्ट्याचा व्यवहार चीनने का आरंभावा, हे गूढ चिनी नागरिकांना तरी उमगले असावे का हेही एक विलक्षण गहनगूढच ! आपल्या हाताने आपल्या पायावर धोंडा पाडून घेण्याचा आत्मघातकी पवित्रा अंगीकारण्याइतपत शी जिनपिंग यांचे नेतृत्व खुळे कसे मानावे, या गूढाचे उत्तर कोण देऊ शकेल ? 'कोविड'ची जन्मभूमी गणल्या जाणाऱ्या (तसे खरोखर असेलच तर) चीनमध्ये या भयकारी विषाणूचा प्रादुर्भाव त्या मानाने लवकरच आटोक्यात कसा आला, हे तर मोठेच गूढ. थेट जपानपासून विविध देशांत गेल्या वर्षभराहून अधिक काळात 'कोविड'च्या चुलत म्हणा वा सावत्र भावंडांनी एका मागोमाग एक अशा वेगवान संसर्गाच्या ज्या लाटा निर्माण केल्या तशा लाटा चीनमध्ये कशा उद्भवल्या नाहीत, या गूढाचा तर पुसटतादेखील उच्चार कोणी कसा करत नाही ? अतिशय कल्पक आणि प्रगल्भ अशी परिणामकारक उपाययोजना करून, समजा, चीनने 'कोविड'च्या प्रादुर्भावाला आळा घातला असेलच तर त्या जालीम उपायांचे तपशील जाहीर करून वैश्विक समुदायाच्या विवंचनेचा भार हलका करण्यास चीन अजूनही का सरसावत नाही, या गूढाचे निराकरण कोणी करावे ? २०१९ सालातील नोव्हेंबर महिन्यापासून आपल्या सगळ्याच्या जगण्याची वीण पुरती उसवून टाकणाऱ्या या विषाणूचे दूरगामी परिणाम नेमके कसे व कोणते असणार आहेत हे गूढ तर भविष्याच्या पोटातच दडलेले आहे आजघडीला. 'कोविड'च्या संसर्गाची तीव्रता आणि वेग हा गर्दीशी, समूह जीवनशैलीशी निगडित असल्याचे वास्तव आजवर पुनःपुन्हा सामोरे आलेले आहे. भारतीयांसारख्या, मुख्यतः समूहप्रधान मानसिकता नांदणाऱ्या समाजांवर या अरिष्टाचे परिणाम किती सखोल शाबीत होतील या गूढाचे उत्तर काळाच्या कुशीतच दडलेले आहे. अशाच काही गूढांच्या चर्चेभोवती गुंफला आहे 'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकातील मजकूर. ■■



## वाचकांना विनंती

अर्थबोधपत्रिकेचा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेत - स्थळावर उपलब्ध आहेत. संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी. www.ispepune.org.in**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

आंतरराष्ट्रीय

# ‘कोविड’विरोधातील चिनी लढा

कोणत्याही देशावर जेव्हा एखादी आपत्ती येते तेव्हा तो देश त्या आपत्तीचा सामना कशा पद्धतीने करतो हे अतिशय महत्त्वाचे ठरत असते. त्या संकटाशी मुकाबला धीरोदात्तपणाने करत असतानाच कोणती नियोजनबद्ध पावले उचलली जातात हे देखील पाहणे उचित ठरते. ‘कोविड-१९’ च्या रूपाने जगावर संकट आले तेव्हा त्याच्या प्रसाराचा वेग पाहून सगळे जग हादरून गेले. अगदी महासत्ता म्हणवणारी अमेरिकाही या रोगापुढे हतबल झालेली जगाने पाहिली. इतरही अनेक देशांमध्ये ‘कोविड’च्या संसर्गामुळे लाखो बळी गेले. या नव्या रोगाचे स्वरूप नेमकेपणाने समजून घेणे आणि त्या नंतर त्याच्याशी दोन हात करण्यासाठी सज्ज होणे हे दुहेरी आव्हान असल्याने सुरुवातीला सर्वत्रच संभ्रमाची स्थिती होती. आपापल्या परीने प्रत्येक देश या संकटाचा सामना करीत होता. या आव्हानाला सामोरे जात असताना कमीत कमी मनुष्यहानी कशी होईल आणि एकूण परिस्थिती लवकरात लवकर नियंत्रणात कशी येऊ शकेल यावर सर्वच देशांचा भर राहिला. जगभरात ज्या ज्या देशांना ‘कोविड’चा फटका बसला त्यामध्ये सर्वांत कमी मनुष्यहानी व कमीत कमी नुकसान झालेला देश म्हणजे चीन. त्यामुळे ‘कोविड’च्या पहिल्या आणि दुस-या लाटेच्या वेळी चीनने या आव्हानाचा सामना कसा केला आणि परिस्थितीवर नियंत्रण कसे प्रस्थापित केले हे पाहणे उद्‌बोधक ठरावे.

जगभरात पसरलेल्या महामारीचा केंद्रबिंदू चीनमधील वुहान हे शहर असल्यामुळे अगदी सुरुवातीपासूनच चीन जगाचे लक्ष्य बनला. वटवाघुळांपासून हा विषाणू प्रथमतः माणसांमध्ये पसरला असा दावा चीनने केला असला तरीही प्रत्यक्षात वुहानमधील प्रयोगशाळेतूनच ‘कोविड’ नामक विषाणू बाहेर पडला आणि तिथूनच तो जगभरात पसरला असा अनेक देशांचा वहिम आहे. जगावर चीनने केलेला हा जैविक हल्ला असल्याचा थेट आरोप अमेरिकेने केला. जिथे रोग जन्माला आला आणि जगभरात पसरला त्या देशाला ‘कोविड’ने सर्वाधिक विळखा घालायला हवा होता. परंतु तसे न होता चीन वगळता जगात सगळीकडे ‘कोविड’ पसरत गेला, योग्य आणि तत्पर



उपाययोजना केल्यामुळे ‘कोविड’चा प्रसार रोखणे शक्य झाल्याचा दावा चीन सरकारने केला तर आपणच तयार केलेल्या विषाणूपासून आपला बचाव कसा करायचा याची पूर्वतयारी चीनने केलेलीच होती असे आरोप उर्वरित जगाने केले आहेत. असे असले तरीही वुहान प्रांतात जेव्हा पहिल्यांदा ‘कोविड’चे रुग्ण सापडू लागले तेव्हापासून या रोगाला रोखण्यासाठी चीनने जी पावले उचलली ती निश्चितपणाने अभ्यासण्याजोगी आहेत. कारण त्या समयोचित उपाययोजनेपायीच चीनला ‘कोविड’चे आव्हान परतवून लावता आले, असा चिनी अभ्यासकांचा दावा आहे.

‘कोविड’चे आक्रमण जगावर झाले ते दोन टप्प्यांमध्ये. दोन्ही वेळेस चीनची रणनीती भिन्न स्वरूपाची होती. कसेही करून रोगाला अटकाव करायचा म्हणून कारवायांमध्ये टोकाची आक्रमकता आणि नागरिकांवर जबरदस्तीने केलेल्या कारवाईचा भाग पहिल्या वेळी अधिक होता. दुस-या वेळी मात्र देशाच्या आर्थिक विकासाचा वेग कायम राखून काटेकोर नियोजनाद्वारे या संसर्गाला नियंत्रित करण्यावर भर होता. पहिल्या लाटेच्या वेळी ‘कोविड’चे स्वरूप सर्वांसाठीच नवीन होते. या रोगाची लक्षणे आणि त्याचे परिणाम यांची पुरेशी कल्पना आलेली नव्हती. वुहानमध्ये पहिल्यांदा जेव्हा ‘कोविड’चे रुग्ण सापडू लागले तेव्हा हा रोग अवघ्या जगाला आपल्या विळख्यात घेईल अशी कल्पना कुणीही केलेली नव्हती. सावधगिरीची उपाययोजना म्हणून वुहान प्रांतात ‘कोविड’चे रुग्ण वाढू लागताच वुहानच्या सीमांची नाकेबंदी चीनने करून टाकली. तेथील विमान, रेल्वेसेवा बंद केली. ‘कोविड’चा प्रसार वुहानपुरता मर्यादित राहायला हवा अशी भूमिका घेतली. वुहानमध्ये टाळेबंदी जाहीर करण्यात आली. मात्र, चीनमधील सुट्यांचा काळ असल्याने चिनी नागरिक अगोदरच मोठ्या प्रमाणावर जगभरात फिरण्यासाठी बाहेर पडलेले होते. त्यामुळे अल्पावधीतच हा रोग पसरू लागला आणि विविध देशांत त्याचा प्रसार होऊ लागला.

‘कोविड’चे स्वरूप आता जितके स्पष्ट झालेले आहे तशी परिस्थिती वर्षभरापूर्वी निश्चितच नव्हती. ‘कोविड’चा संसर्ग होऊ नये म्हणून सामाजिक विलगीकरण गरजेचे आहे हे लक्षात आल्याने ठिकठिकाणी सामाजिक विलगीकरण आणि टाळेबंदी होऊ लागली. दरम्यान, वुहान प्रांतात ‘कोविड’ खूप वेगाने पसरला होता. परंतु चिनी सरकारने ती माहिती बाहेर पडू दिली नाही. आपल्या निरंकुश सत्तेचा वापर करून चिनी राजवटीने ‘कोविड’ रोखण्यासाठी नागरिकांवर जोरजबरदस्ती केली असे आरोप आंतरराष्ट्रीय समुदायातून होऊ लागले. परंतु, त्या कशाचीही पर्वा न करता ‘कोविड’चा संसर्ग

झालेल्यांनी घरातून बाहेर पडू नये म्हणून चीनमध्ये ‘घरबंदी’ जारी केली. इतके केल्यानंतरदेखील तिथे ‘कोविड’ वेगाने पसरलाच. सुरुवातीच्या काळात अनेक चिनी नागरिकांना ‘कोविड’च्या संसर्गाने जीव गमवावा लागला. मात्र ‘कोविड’मुळे झालेल्या मृत्यूंची खरी आकडेवारी जगापर्यंत पोहोचू नये याची पुरेपूर खबरदारी चीनने घेतली. त्या काळात ‘कोविड’च्या संसर्गामुळे आणि वेळेत योग्य ती आरोग्यसेवा न मिळाल्याने लाखो लोक मृत्यूमुखी पडले असावेत, असा आरोप आंतरराष्ट्रीय समुदायाकडून चीनवर होत राहिला.

वुहानच्या बरोबरीने राजधानीचे शहर असणा-या बीजिंगमध्ये व महत्त्वाच्या अन्य काही शहरांत ‘कोविड’चा प्रसार होतो आहे असे लक्षात आल्यानंतर चीनने अधिक आक्रमक पावले उचलली आणि आवश्यक वाटेल तिथे तातडीने ‘टाळेबंदी’ जाहीर केली. या काळामध्ये नागरी स्वातंत्र्यावर अतिक्रमण झाले आणि जोरजबरदस्तीने कारवाया केल्या असे आरोप चीनवर सातत्याने होत राहिले. हळूहळू रोगाचा प्रसार कमी होत गेला आणि बराचसा आटोक्यात आला आणि ‘न्यू नॉर्मल’च्या दिशेने जगाची सुरुवात झाली.

‘कोविड’ची पहिली लाट खूप काही शिकवून गेली होती. पहिल्या लाटेच्या धड्यानंतर पुढील काळात अधिक समर्थपणाने लढण्यासाठी चीन सज्ज झालेला होता. संसर्गजन्य रोगांच्या प्रसारादरम्यान देशातील आरोग्ययंत्रणांवर कसा ताण येतो, टाळेबंदी केल्यानंतर अर्थकारणाचे चाक कशा पद्धतीने रुतत जाते आणि या काळात नेमकी कोणती पावले उचलायला हवी या सगळ्याचा विचार आवश्यक ठरला होता. आपत्ती आल्यानंतर किमान कालावधीत देश त्याच्या प्रतिकारासाठी कशा प्रकारे सज्ज होऊ शकतो याचाही विचार गरजेचा बनला. अशी आपत्ती देशावर पुन्हा केव्हाही येऊ शकते हे लक्षात घेऊन चीनने आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सक्षम करण्यावर तातडीने भर दिला. ‘कोविड’च्या पहिल्या लाटेनंतर सामान्य नागरिकांचा रोष सरकारच्या विरोधात वाढू लागला आहे, याची जाणीव चिनी सरकारला झालेली होती. त्यामुळे दुस-या लाटेचे आव्हान पुढ्यात उभे ठाकल्याबरोबर चीनने योग्य रीतीने नियोजन केले आणि नियोजनबद्ध आखणी केली. लोकांचा हरपलेला विश्वास आणि सरकारची घसरलेली लोकप्रियता मारक ठरू शकते हे लक्षात आल्याने जनसामान्यांमधील असंतोष कमी करण्यावर आणि गमावलेला विश्वास पुन्हा प्रस्थापित करण्यावर चीनने भर दिला. अतिशय हुशारीने पावले टाकली. सरकारची प्रतिमा नागरिकांच्या मनात पुन्हा



उजळण्यासाठी प्रयत्न सुरू केले. राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यासह सरकारमधील नेत्यांनी लोकांना प्रत्यक्ष जाऊन भेटण्यावर, त्यांच्याशी संवाद साधण्यावर अधिक भर दिला. लोकहिताच्या गोष्टी राबवल्या जाऊ लागल्या. त्यामुळे सरकारवरील रोष हळूहळू कमी होत गेला. सरकारची प्रतिमा जनमानसात उंचावण्यासाठी शासकीय प्रतिनिधी आणि प्रशासकीय यंत्रणांच्या माध्यमातून केलेल्या प्रयत्नांना यश मिळत गेले. सरकार जनहिताचे निर्णय घेईल असा विश्वास पुनर्स्थापित होऊ लागला.

**लस संशोधनावर भर**

‘कोविड’रूपी संकटाशी दोन हात करायचे असतील तर ‘टाळेबंदी’ ही तात्पुरती मलमपट्टी ठरते. तो कायमस्वरूपी उतारा नाही हे एव्हाना जगभरातील सगळ्याच देशांच्या ध्यानात आले होते. लस हेच संसर्गावरील प्रभावी उत्तर ठरू शकते हे लक्षात घेऊन चीननेदेखील ‘कोविड’ प्रतिबंधक लस शोधण्यासाठी कंबर कसली. देशभरातील संशोधन संस्था व शास्त्रज्ञांना आवाहन करून लशींचे संशोधन हा विषय प्राधान्यक्रमावर ठेवला. नव्या प्रयोगशाळांची उभारणी करण्यासाठी मान्यता, आवश्यक पायाभूत सुविधांचा तत्काळ पुरवठा आणि भरघोस आर्थिक मदतीची तरतूद करून सरकारने संशोधन संस्थांना आवश्यक ते सक्षम पाठबळ दिले. ‘कोविड’ हा विषाणू चीनमधूनच पसरलेला असल्याने किंबहुना, चीननेच तो पसरवला असल्याचे आरोप होत असल्याने उद्या जगातील अन्य देशांनी आपल्याला लस देण्यास जर नकार दिला तर देशांतर्गत लस तयार असायला हवी आणि आपला देश त्या बाबतीत आत्मनिर्भर असायला हवा, या भूमिकेतून चीनने लस संशोधनावर लक्ष केंद्रित केले. नवीन लस संशोधन करण्यासाठी आवश्यक असणारे सर्व प्रकारचे पाठबळ संशोधकांना प्राप्त झाल्यामुळे अधिक वेगाने संशोधन सुरू झाले आणि ‘कोविड’ रोखू शकणारी परिणामकारक अशी लस काही कालावधीमध्ये चीनमध्ये विकसित झाली. जगभरात भारत, रशिया या मोजक्या देशांनी तोपर्यंत लशीचे संशोधन करण्यात यश मिळवले होते. या मालिकेमध्ये चीनदेखील स्वतःच्या बळावर सन्मानाने जाऊन बसला. ‘कोविड’च्या संदर्भात जगभरातील अनेक देशांचा चीनविरोध लक्षात घेऊन लशींच्या बाबतीत देश स्वयंपूर्ण असणे अधिक गरजेचे आहे, हे चीनने पुष्कळ अगोदर ओळखलेले होते.त्या दृष्टीने उचललेल्या पावलांना आणि त्यांच्या नियोजनबद्ध प्रयत्नांना यश आल्यामुळे चीनने लसीकरणाची मोहिम तातडीने हाती घेतली. देशातील अधिकाधिक लोकांना लस मिळून ते सुरक्षित कसे राहतील याकडे विशेषत्वाने लक्ष देण्यात आले.

## सक्षम व प्रभावी आरोग्य यंत्रणा

'कोविड-१९' सारखा रोग ज्या वेगाने पसरत जातो तो लक्षात घेता अगदी कमी काळामध्ये आरोग्ययंत्रणावर ताण येऊ शकतो याचा पुरेसा अनुभव पहिल्या लाटेच्या वेळी आलेला होता. त्यामुळे दुसरी लाट येण्यापूर्वीच आपत्ती व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने चीनने पूर्वतयारी करून ठेवली होती. 'कोविड'च्या उपचारासाठी केंद्रे उभी करण्याची धावाधाव ऐनवेळी करण्यापेक्षा भविष्यात हे आव्हान पुन्हा एकदा दार ठोठावू शकेल हे लक्षात घेऊन चीनने विविध शहरांतील मोठमोठ्या मैदानांमध्ये हजारोंच्या संख्येने 'कोविड' उपचार केंद्रे प्रस्थापित केलेली होती. 'कोविड' संक्रमित झालेल्या व्यक्तीचे निदान योग्य वेळी झाले नाही तर अशी व्यक्ती 'सुपरस्प्रेडर' बनून 'कोविड'चा प्रसार करीत इतर लोकांमध्ये फिरते आणि त्यामुळे 'कोविड' नियंत्रणाबाहेर जातो हे वास्तव लक्षात आल्याने चीनने त्यावर विशेष लक्ष केंद्रित केले. त्यासाठी घरोघरी जाऊन 'कोविड'ची चाचणी करण्याबाबत सरकार आग्रही राहिले. लोकांची 'कोविड' चाचणी करण्याची यंत्रणा जितकी सक्षम तितक्या अधिक प्रमाणात या रोगाचे संक्रमण रोखणे शक्य होऊ शकते हे लक्षात घेऊन त्याचे एक 'प्रारूप' निश्चित करण्यात आले. त्या अंतर्गत शहराचे विविध विभाग करण्यात आले आणि त्या त्या विभागातील सर्व चाचण्यांची अधिकृत नोंद करण्याची जबाबदारी एकेका प्रमुख अधिका-याकडे सोपवण्यात आलेली होती. उत्साही स्वयंसेवकांची मोठी फौज या अधिका-याच्या दिमतीला देण्यात आलेली होती. प्रत्येक नागरिकाची नोंद ठेवून घराघरांत जाऊन 'कोविड' चाचणी करण्याची मोहिम राबवण्यात आली. ज्या व्यक्तींना 'कोविड'चा संसर्ग झाल्याचे निष्पन्न झाले अशा सर्वांची रवानगी तातडीने 'कोविड' उपचार केंद्रात तसेच विलगीकरण केंद्रात करण्यात आली आणि तिच्या संपर्कात आलेल्या सर्व व्यक्तींची वेगळी यादी बनवून त्यांचा तातडीने शोध घेऊन त्यांचेही तत्काळ विलगीकरण करण्यात आले. 'कोविड'चा फैलाव होण्यास, परस्परांशी होणारा संपर्क हीच बाब सर्वाधिक कारणीभूत ठरते हे लक्षात घेऊन ही पावले उचलल्याने रोगाचा प्रसार रोखणे शक्य झाले. याच्या जोडीला 'रोबोटिक' तंत्रज्ञानाचा वापर करून कमीत कमी थेट संपर्क येईल याची दक्षता घेऊन लोकांना सुविधा पुरवण्यावर भर देण्यात आला. रुग्णांना औषधे देणे, जेवणाचे डबे पोहोचवणे या कामांसाठी यंत्रमानवांचा वापर रुग्णालयांमध्ये करण्यात आला. वाहतूक पोलिसांच्या शिरस्त्राणामध्ये 'थर्मल चेकिंग' सुविधा असलेले तंत्रज्ञानसुद्धा आले.



'कोविड'चे आक्रमण झाल्यानंतर जगातील अनेक देशांना टाळेबंदी जाहीर करावी लागली. जगभरातील विमानप्रवास थांबले. आयात-निर्यात थांबली. औद्योगिक कंपन्यांचे काम ठप्प झाले. अर्थकारणाचे चाक रुतल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली. पर्यटन, हॉटेल या क्षेत्रांना मोठा आर्थिक फटकाही बसला. नफ्या-तोट्याचे गणित गडबडले. कामगारवर्गाला पोसणे अवघड होऊ लागले. परिणामी मोठ्या प्रमाणात कामगार कपात झाली. मनुष्यबळावरील खर्च परवडेनासा झाल्याने वेतनकपातही केली जाऊलागली. ज्यांनी रोजगार गमावले किंवा ज्या हातांना नवे काम मिळण्याची आशा उरली नाही, अशी लाखो माणसे आपापल्या गावात स्थलांतर करून गेली. त्यामुळे 'कोविड'चे आव्हान रोखायचे की अर्थव्यवस्थेला सांभाळायचे, असे दुहेरी आव्हान निर्माण झालेले होते. या सर्व स्थित्यंतराच्या काळामध्ये देशाच्या आर्थिक विकासाचा दर वाढत राहील याकडे मात्र चीनने सुरुवातीपासूनच जाणीवपूर्वक लक्ष्य दिले. 'कोविड'ची पहिली लाट ओसरल्यानंतर जग जेव्हा 'न्यू नॉर्मल'च्या दिशेने जाऊ लागले तेव्हापासूनच चीनचा भर आर्थिक प्रगतीवर राहिला. नवे उद्योग सुरू केले आणि त्यांना प्रोत्साहन दिले. नव्या उत्पादन कंपन्यांना प्रोत्साहन देऊन त्यांच्यासाठी पायघड्या घातल्या. ज्या ज्या माध्यमांतून आर्थिक प्रगतीचा दर वाढवणे शक्य होते त्या सर्व उपाययोजना चीनने केल्या. बीजिंग आणि महत्त्वाच्या अन्य शहरांमध्ये 'कोविड'चा फारसा प्रसार झालेला नसल्याने संसर्गाच्या संकटात चीनचे फारसे आर्थिक नुकसानही झालेले नव्हते. ही बाबदेखील चीनच्या पथ्यावर पडली आणि त्याद्वारे चीनचा आर्थिक विकासाचा दर अन्य देशांच्या तुलनेत चांगला राहिला. २०२१ सालच्या पहिल्या तिमाहीचा आढावा घेतला असता असे लक्षात येते की चीनच्या देशी ठोकळ उत्पादनामध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत १८.३ टक्क्यांनी घसघशीत वाढ झालेली आहे.

सारांशरूपाने सांगायचे तर, 'कोविड'च्या संकटापुढे सगळे जग हतबल झालेले दिसत असताना चीनने मात्र सक्षमपणे व नियोजनबद्ध रीतीने लढा दिला. मात्र, जगावरील या संकटाला चीनच जबाबदार असल्याची अनेकांची धारणा असल्यामुळे चीनच्या या प्रयत्नांकड़ेसुद्धा साशंक दृष्टीनेच अभ्यासक आजही पाहतात. अर्थात, असे असले तरीदेखील 'संकट हीच इष्टापत्ती' मानून आपत्तीच्या काळातही ठामपणाने उभे राहता येते आणि संकटावर मात करता येऊ शकते याचे एक वेगळे उदाहरण म्हणून चीनच्या प्रयत्नांकडे नक्कीच पाहता येऊ शकेल. ■■

आंतरराष्ट्रीय

# आनंदी लोकांचा देश

जगातील सर्वांत आनंदी लोकांचा देश म्हणून फिनलँड या देशाची सलग चौथ्यांदा निवड झालेली आहे. फिनलँडवासियांना अतिशय अभिमान वाटावा आणि इतर कोणत्याही देशातील माणसाचे कुतूहल जागे व्हावे अशी ही बाब. एकच देश सातत्याने इतकी वर्षे आनंदी कसा राहू शकतो, हा प्रश्न अगदी स्वाभाविकपणे कोणाच्याही मनात येईल. ''इतर विकसित देशांच्या तुलनेत हा देश अधिक आनंदी ठरावा असे काय वेगळेपण आहे या देशात?...'' या विषयीचे कुतूहल अगदी स्वाभाविक आहे. फिनलँडच्या आनंदाचे गणित नक्की आहे तरी काय, हे नीट समजून घेणे त्या दृष्टीनेच औत्सुक्याचे ठरावे.

सध्या सगळे जग कोरोनाच्या अवघड काळातून जात असतानादेखील संयुक्त राष्ट्रांच्यावतीने प्रतिवर्षाप्रमाणे 'वर्ल्ड हॅपीनेस रिपोर्ट' तयार करण्यात आला आणि आनंदी देशांची क्रमवारी त्यांत जाहीर करण्यात आली. चालू वर्षासाठीच्या जागतिक क्रमवारीमध्ये फिनलँड हा देश सलग चौथ्यांदा जगात पहिल्या क्रमांकावर आला आहे. प्रस्तुत 'वर्ल्ड हॅपीनेस रिपोर्ट'मध्ये जगभरातील १५६ देशांचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. जगभरातील देशांच्या क्रमवारीकडे नजर टाकल्यास असे लक्षात येते की, या मालिकेमध्ये डेन्मार्क दुस-या क्रमांकावर आहे. स्वित्झर्लंड तिस-या स्थानी तर आइसलँड हा देश चौथ्या क्रमांकावर आहे. विशेष म्हणजे, अत्याधुनिक अशा भौतिक सुविधा आणि आत्यंतिक श्रीमंती व समृद्धी असणा-या विकसित देशांमधील एकही देश आनंदाच्या मालिकेत पहिल्या दहा क्रमांकातही जागा मिळवू शकलेला नाही. या मालिकेमध्ये ब्रिटन गेल्या वर्षी १३व्या स्थानावर होता मात्र चालू वर्षी ते स्थान घसरून १९ व्या क्रमांकावर गेले आहे. आनंदी लोकांच्या देशात भारताचा क्रमांक १३९ वा आहे. गत वर्षी भारत १४४ व्या क्रमांकावर होता तिथून आता काही प्रमाणात भारताचे स्थान उंचावलेले असले तरीही नेपाळ, बांगलादेश, म्यानमार, पाकिस्तान, चीन हे देश भारतापेक्षा क्रमवारीमध्ये सरस असल्याचे स्पष्ट होते.



'आनंद' ही संकल्पना व्यापक आणि व्यक्तिसापेक्ष असल्याने प्रत्येकजण आपापल्या पद्धतीने तिची स्वतंत्र व्याख्या करू शकतो, हे लक्षात घेऊन संयुक्त राष्ट्रांनी प्रत्येक देशाकडून माहिती घेताना त्यासाठी काही निकष निश्चित केलेले आहेत. त्या निकषांनुसार संदर्भित माहिती प्राप्त केली जाते. विविध देशांतील नागरिकांशी प्रातिनिधिक संवाद साधून ही माहिती संकलित केली जाते. देशाचे सकल राष्ट्रीय उत्पन्न, भ्रष्टाचाराची पातळी, परस्परसहकार्याची भावना, मुक्त स्वातंत्र्याचा मिळणारा आनंद अशा अनेक गोष्टींचा अंतर्भाव त्यात केलेला आहे. त्यांत जो देश अधिक सरस ठरतो तो क्रमवारीत वरचढ ठरतो. या सगळ्या कसोट्यांवर फिनलँड हा देश सलग चार वर्षे कसा अव्वल ठरतो आहे, ही बाब सर्वांसाठीच औत्सुक्याची ठरते.

फिनलँडची लोकसंख्या २०२० सालच्या जनगणनेनुसार ५५ लाखांपेक्षा अधिक आहे. प्रतिकूल हवामान फिनलँडच्या पाचवीला पुजलेले आहे. वर्षातील २०० दिवस इथे हिवाळाच असतो. दोन दोन महिने उलटले तरीही सूर्य क्षितीजावर उगवलेला दिसत नाही. तापमान २० अंश सेल्सिअसवरून शून्य अंशापर्यंत खाली कधीही जाऊ शकते. असे असतानाही हा देश जगातील सगळ्यात आनंदी देश कसा, याचे आश्चर्य वाटल्याखेरीज राहत नाही. मात्र, त्या कारणांचा शोध घेतला असता हे गुपित उलगडत जाते. लोक आनंदी राहावेत म्हणून फिनलँडमध्ये दोन गोष्टी जाणीवपूर्वक केलेल्या आहेत. पहिले म्हणजे तेथील सरकार आणि प्रशासन या विषयी अत्यंत सजग दृष्टिकोन बाळगून असते. त्यामुळे लोकांच्या जीवनव्यवहारात सुलभता आणण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून केला जातो. दुसरे म्हणजे, लोकांचे जीवनमान अधिकाधिक चांगले राहावे यासाठी राष्ट्रीय धोरणाचा भाग म्हणून काही गोष्टी देशाने स्वीकारलेल्या आहेत. त्या नुसार जीवनशैली आखलेली आहे. या दोहोंचे आकलन नीट झाले की या देशातील नागरिक आनंदी का राहतात या मागचे गुपित उलगडत जाते.

**सरकार, प्रशासनावर विश्वास**

फिनलँडमध्ये राहणा-या नागरिकांचा सरकार आणि प्रशासकीय यंत्रणा यांच्यावर पूर्ण विश्वास आहे. देशातील नागरिक केंद्रस्थानी ठेवून त्यांच्या हितासाठी उपयुक्त ठरणा-या अनेक कल्याणकारी योजना सातत्याने सरकारतर्फे राबवल्या जातात. या देशात लोकशाही व्यवस्था उत्तम रीतीने रुजलेली असून तिथे स्थिर सरकार आहे. प्रशासकीय यंत्रणेमध्ये भ्रष्टाचाराचे प्रमाण अत्यल्प असल्याने प्रशासकीय यंत्रणांमार्फत आवश्यक सर्व कामे करवून घेताना नागरिकांना कोणत्याही मनस्तापाला सामोरे जावे

लागत नाही. नागरी हितासाठी आवश्यक असणा-या सर्व कामांबाबत प्रशासनही सतर्क असल्याने त्याच्याद्वारे अशा सर्व कामांची तत्परतेने पूर्तता केली जाते. एकूणच जीवनव्यवहारामध्ये सुलभता आणण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. इथे पुरेपूर स्वातंत्र्य अनुभवायला मिळते. देशातील करप्रणाली सुटसुटीत आहे. सक्षम आणि कार्यक्षम अशी आरोग्ययंत्रणा आहे. देशातील ८० टक्क्यांहून अधिक नागरिकांचा पोलिसयंत्रणेवर पूर्ण विश्वास आहे. जगभरातील अन्य देशांच्या तुलनेमध्ये हे प्रमाण किती तरी अधिक आहे. परिणामतः गुन्हेगारीचे प्रमाणही फिनलँडमध्ये कमी आहे.

**उद्योगसंस्थांमधील कार्यशैली :**

जागतिक अर्थकारणावरही फिनलँडने स्वतःचा वेगळा ठसा उमटवलेला आहे. मोबाइल विश्वात वेगळेपण जपलेली 'नोकिया', जागतिक स्तरावर विशेष लोकप्रिय ठरलेला 'अँग्री बर्ड' हा 'ऑनलाइन' खेळ तयार करणारी 'रोव्हिओ', 'क्लॅश ऑफ कॅन्स' हा खेळ तयार करणारी 'सुपरसेल' या कंपन्यांनी बाजारात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केलेले आहे. एखादा व्यवसाय कसा चालवावा, तेथील कार्यपद्धती कशी असायला हवी, तिथे काम करणा-या कर्मचा-यांना कशा पद्धतीने वागवले जावे याचे आदर्श फिनलँडमधील उद्योगसंस्थांमध्ये प्रस्थापित झालेले आहेत. व्यवस्थापन आणि कर्मचारी यांच्यामध्ये पदांची वर्गवारी करून त्यांत उच्चनीचता ठेवली जात नाही. त्यामुळे सर्वजण एकाच पातळीवर राहून काम करतात. कर्मचारी काम करतात की नाही यावर देखरेख करण्यासाठी कुणाचीही नियुक्ती केली जात नाही. कर्मचारी स्वयंस्फूर्तीने व स्वतःची जबाबदारी लक्षात घेऊन काम करतात. कंपनीतील महत्त्वाचे आणि धोरणात्मक निर्णय कंपनीचे व्यवस्थापकीय मंडळ परस्पर न घेता सर्व कर्मचा-यांना विश्वासात घेऊन सामूहिक पातळीवर घेते. कंपनीतील सर्व विभागांमध्ये आणि काम करणा-या सर्व घटकांमध्ये उत्तम सुसंवाद राहील असा प्रयत्न केलेला दिसतो. त्यामुळे सर्वांमध्ये सांघिक भावना निर्माण होते. परस्पर हेवेदावे कमी होतात. सौहार्दपूर्ण वातावरणामुळे कंपनीची उत्पादकताही वाढते असे लक्षात आले आहे.

गेल्या दशकभरापासून फिनलँडमधील विविध कंपन्यांमध्ये ही कार्यसंस्कृती अतिशय चांगल्या रीतीने रुजलेली आहे. त्याचा सकारात्मक परिणाम होतो आहे, असे अभ्यासकांचे मत आहे. इतर देशांनीही या कार्यसंस्कृतीचा अंगीकार करण्याची सुरुवात केलेली आहे. ज्या ठिकाणी माणूस काम करतो आणि दिवसातील सर्वाधिक वेळ व्यतीत करतो तेथील कामाचे स्वरूप आणि त्यातून लाभणा-या समाधानाची



पातळी किती आहे यावर त्या व्यक्तीचा आनंद अवलंबून असतो. कामाच्या ठिकाणी मिळणारे समाधान कोणत्याही माणसाच्या लेखी अधिक महत्त्वाचे असते. काम कोणतेही असले तरी ते काम करण्याचे स्वातंत्र्य आणि आनंद प्रत्येकाला मिळेल असा प्रयत्न फिनलँडमधील उद्योगसंस्थांमध्ये जाणीवपूर्वक केलेला आहे. त्यामुळे जागतिक पातळीवर विविध क्षेत्रांत आघाडीवर असणा-या कंपन्यांच्या तुलनेत एक वेगळी कार्यसंस्कृती विकसित करण्यात फिनलँडला यश आलेले आहे.

**सजग पालकत्वाची जाणीव**

पालकत्वाच्या बाबतीतदेखील हा देश विशेष जागरूक आहे. आईच्या बरोबरीने वडिलांनीदेखील आपल्या मुलांच्या जडणघडणीत, संगोपनात आणि शिक्षणात लक्ष घालावे अशी अपेक्षा आहे. त्यामुळे फिनलँडमध्ये आईपेक्षा वडीलच घरात राहून मुलांना अधिक वेळ देतात आणि त्यांच्या जडणघडणीकडे मनापासून लक्ष पुरवतात असे चित्र इथे घराघरांत दिसून येते. हे देखील या देशाचे एक वेगळेपणच मानावे लागते. पुरुषांच्या बरोबरीनेच आपल्या मुलांच्या विकासासाठी अनेक महिने किंवा

मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी
यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन

उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील
भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या
तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख

तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ

लेखक - नरेन्द्र चपळगावकर

पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये

समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान
आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज

वर्षे घरातच राहण्यास प्राधान्य देणा-या महिलांची संख्याही मोठी आहे. हे करताना आपण आपल्या कारकिर्दीवर पाणी सोडत आहोत किंवा फार मोठा त्याग करत आहोत अशी त्यांची भावना नसते तर आपली मुलांच्या जडणघडणीचा काळ अधिक महत्त्वाचा असल्याने त्यासाठी आपण अधिकाधिक वेळ द्यायलाच हवा ही जाणीव त्यांच्यामध्ये उत्तम रीतीने रुजलेली असल्याची ती खूण ठरते आपण यात काही विशेष करतो आहोत असे पालकांना अजिबात वाटत नाही, असे त्यांच्या प्रतिक्रियांतून लक्षात येते.

आजघडीला समाजातील असमानता आणि श्रीमंत-गरीब यातील वाढती आर्थिक विषमतेची दरी ही एक मोठी समस्या जगातील अनेक देशांच्या पुढ्यात आहे. श्रीमंत वर्गातील लोक संख्येने कमी असले तरी बहुतांश संपत्ती त्यांच्याकडेच एकवटलेली आहे आणि गरीब वर्गाची संख्या अधिक असताना त्यांना मात्र पैशांअभावी हलाखीचे जीवन जगावे लागते आहे. या दरीमुळेच समाजात असंतोष वाढतो. त्याचीच परिणती म्हणजे, समाजात भ्रष्टाचार, गुन्हेगारी या सारख्या समस्या वाढत जातात. ज्या समाजात असंतोष अधिक तो कधीही आनंदी राहू शकत नाही. हे धोके फिनलँडने लक्षात घेतले आणि आवश्यक ती पावले उचलली. देशातील गरीबातील गरीब व्यक्ती कोणत्याही कारणाने दुर्लक्षित राहणार नाही याकडे सरकारी व्यवस्थेने अतिशय जागरूकतेने लक्ष दिले. आपण दुर्लक्षित नाही आणि आपल्या किमान गरजांच्या पूर्ततेसाठी सरकार आपल्यासमवेत आहे ही जाणीव तेथील प्रत्येकात त्यामुळे निर्माण झाली. जगातील अनेक देश या समस्येशी झगडत असताना फिनलँड हा देश मात्र या वेगळेपणामुळे उठून दिसतो.

देशवासियांच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या विकासासाठी फिनलँडने एक राष्ट्रीय धोरणच निश्चित केले आहे. त्याला Sisu असे नाव दिले आहे. याचा अर्थ ‘प्रबळ इच्छाशक्ती’ असा होतो. कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीवर प्रबळ इच्छाशक्तीच्या मदतीने मात करता येते असा विश्वास प्रत्येक देशवासियाच्या मनात निर्माण करण्यासाठी फिनलँड हा देश जाणीवपूर्वक प्रयत्न करतो. जेव्हा जेव्हा परिस्थिती आपल्या विरोधात असते आणि प्रतिकूलता आपली परीक्षा पाहत असते तेव्हा हार न पत्करता टिकून राहणे महत्त्वाचे असते हा फिनलँडमधील राष्ट्रीय धोरणाचा गाभा आहे. हवामानाच्या प्रतिकूलतेसह कोणत्याही विपरित परिस्थितीमध्ये जगण्याचे बळ या संकल्पनेतून नागरिकांना मानसिक आधार मिळत राहतो. फिनलँडमधील नागरिक हे इतर देशातील लोकांच्या तुलनेत अधिक आनंदी असतात त्या मागे त्या सर्वांनी अंगीकारलेले राष्ट्रीय



धोरण महत्त्वपूर्ण योगदान देते असे येथील अभ्यासकांचे मत आहे. प्रतिकूल परिस्थितीमध्ये माणसाच्या मनात जी असंतोषाची, नैराश्याची किंवा हताशपणाची भावना निर्माण होते, मनासारख्या गोष्टी घडल्या नाही की व्यक्ती दुःखी होऊन जाते अशा परिस्थितीत Sisu ही संकल्पना फिनलँडमधील नागरिकांना मानसिक आधार देण्याचे काम करते. प्रत्येक प्रतिकूलतेकडे पाहताना नकारात्मक विचार मनात येऊ द्यायचे नाहीत आणि प्रबळ इच्छाशक्तीच्या बळावर कोणत्याही संकटावर मात करण्यासाठी आपण सज्ज व्हायचे हाच संदेश त्यातून दिला जातो आणि सकारात्मकता जागवली जाते.

**मुख्य भर मुक्त आनंदी जगण्यावर**

मन प्रसन्न असेल तर माणूस आपोआपच आनंदी होतो आणि त्याला आनंदी राखण्यात निसर्ग महत्त्वाची भूमिका बजावतो हे साधे सूत्र लक्षात घेत देशातील नागरिक अधिकाधिक निसर्गाच्या सहवासात कसे राहतील असा प्रयोग फिनलँडमध्ये अतिशय जागरूकतेने केलेला आहे. सिमेंटची जंगले वाढवत नेण्यापेक्षा नैसर्गिक जंगलांचे संवर्धन व रक्षण करण्यावर या देशात भर दिलेला आहे. या देशातील एकूण भूभागापैकी जवळपास ७५ टक्के भूभाग केवळ जंगलांनीच व्यापलेला आहे. लोकांच्या मनावर आणि त्यांच्या भावभावनांवर निसर्गाचा खूप सकारात्मक परिणाम होतो, म्हणूनच फिनलँडने ‘फॉरेस्ट थेरपी’ जाहीर केलेली आहे. त्या नुसार, निसर्गावर प्रत्येक माणसाचा समान हक्क आहे, ही एक अनोखी संकल्पना या देशात विकसित केलेली आहे. त्यामुळे देशातील कोणतीही व्यक्ती, कोणत्याही वेळी निसर्गाच्या सहवासात जाऊन कितीही काळ बसू शकते. फिनलँडमधील जंगले, येथील नद्या, तलाव किंवा हिरवाईने भरलेला परिसर अशा ठिकाणी जाण्यासाठी कोणत्याही नागरिकाला कुणीही आडकाठी करीत नाही. जंगलात जाण्यासाठी, डोंगरावर भटकण्यासाठी, नदीकिनारी भटकंती करण्यासाठी नागरिकांना मुक्त स्वातंत्र्य आहे. निसर्गाशी माणूस अधिकाधिक कसा जोडला जाईल असा प्रयत्न इथे केला जातो. आपण सर्वजण मुक्त आहोत आणि आपण सर्वजण समान आहोत ही भावना सर्वांमध्ये समाज रुजावी म्हणून ‘सोना बाथ’ अर्थात ‘सामूहिक स्नान’ ही संकल्पना फिनलँडमध्ये फार चांगल्या रीतीने रुजलेली आहे. तिला अश्लीलतेचा जराही स्पर्श नाही. सर्वांनी एकत्रित यावे, कपडे उतरवावेत आणि मोकळ्या मनाने निर्वस्त्र होऊन पाण्यात उतरावे यासाठी फिनलँडमध्ये लाखोंच्या संख्येने ‘सोना बाथ’ साठीच्या सुविधा उभारण्यात आलेल्या आहेत. सामूहिक स्नान करण्यासाठी एकत्र आल्याने सर्वजण समान आहेत ही भावना रुजण्यास मदत

होते. एकत्रित स्नानामुळे मानमरातब, प्रतिष्ठा, पदाचा अहंकार या गोष्टी आपोआपच दूर होऊन जातात आणि माणुसकीच्या नात्याने सगळे एकत्र येतात. अशी येथील विचारशील नागरिकांची धारणा आहे.

शालेय वयापासून मुलांना आनंदी कसे राहायचे हे अगदी साध्या साध्या गोष्टींतून शिकवले जाते. परस्परांमध्ये मित्रप्रेमाची आणि समानतेची भावना रुजावी तसेच मुलांना आरोग्याचे, चांगल्या आहाराचे महत्त्व समजावे यासाठी प्रयत्न करण्यात येतात. लहानपणापासूनच मुलांना पालकांचा अधिकाधिक वेळ मिळेल याकडे सरकारचा कटाक्ष असतो. लहान मुले निसर्गाच्या सहवासात अधिकाधिक कशी रमतील आणि त्यांचे व्यक्तिमत्त्व कसे खुलेल यावर भर देण्यात येतो. फिनलँडमध्ये मुलांना शिक्षण मोफत दिले जाते. त्याचप्रमाणे आपण स्वतंत्र असल्याची जाणीव त्यांच्यात रुजावी या दृष्टिकोनातून मुले घरापासून शाळेत कुणाचीही मदत न घेता चालत जावीत अशी व्यवस्था केलेली आहे. अभ्यासातही मुले ताणमुक्त आणि आनंदाने कशी शिकतील यावर सर्वच शिक्षकांचा कटाक्ष असतो. मुलांच्या नाविन्यपूर्ण कल्पना आणि विचारांना प्रोत्साहन दिले जाते. सक्षम अशी समाजव्यवस्था असल्याने समाजात वावरताना मुलांचा सर्वांगीण विकास होत जातो. तसेच दर्जेदार 'डे-केअर' सुविधा उपलब्ध असल्याने अगदी लहानपणापासून तिथेही मुले कायम आनंदी कशी राहतील याकडे सजगतेने लक्ष दिले जाते. अर्थात, हे आशादायी चित्र एका बाजूला असले तरीही दुस-या बाजूला काही अभ्यासकांच्या मते, फिनलँडमधील प्रौढ व्यक्तींच्या तुलनेत लहान मुले जगाच्या तुलनेत मात्र कमी आनंदी आहेत. लहान वयोगटातील आणि किशोरवयीन मुलांच्या संदर्भातील जागतिक स्तरावरचे चित्र वेगळे आहे. अलीकडेच 'युनिसेफ'च्या वतीने लहान मुलांच्या संदर्भात एक जागतिक सर्वेक्षण केले. त्यामध्ये ३५ देशांतील १० वर्षापर्यंतच्या आणि १२ ते १५ वर्षांपर्यंतच्या लहान मुलांची मते जाणून घेतली. त्या नुसार विविध देशांतील लहान मुले किती आनंदी आहेत याची क्रमवारी काढण्यात आली. या क्रमवारीत फिनलँडचा क्रमांक १५ वा आहे. अल्बेनिया हा देश या क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर आलेला आहे. मात्र, लहान मुलांना घडवण्यासाठी आम्ही निश्चितपणाने चांगले काम करू आणि आवश्यक त्या सुधारणा करू असा निर्धार फिनलँडच्या धोरणकर्त्यांनी आता व्यक्त केला आहे.

भावनिक अस्थिरतेसाठी आजकालची समाजमाध्यमे मोठ्या प्रमाणावर कारणीभूत ठरत आहेत, असे समाजमाध्यमांच्या अभ्यासकांनी लक्षात आणून दिले



आहे. मनात निर्माण होणा-या भावभावना सातत्याने समाजमाध्यमांवर व्यक्त करण्याची सवय लागल्यामुळे नकळतपणाने तिथे एकमेकांशी तुलना करण्याची भावना निर्माण होते आणि त्यातून अधिक भावनिक अस्थिरता निर्माण होते असे अभ्यासांती लक्षात आले आहे. समाजमाध्यमांच्या अतिरेकी वापरामुळे, आजुबाजूला आनंद देणा-या अशा ज्या किती तरी गोष्टी असतात त्यांचा निखळ आनंद घेण्यास माणसे मुकतात असेही अभ्यासकांचे निरीक्षण आहे. हे सारे धोके लक्षात घेऊन समाजमाध्यमांपासून शक्य तितके दूर राहण्याचे धोरण फिनलँडने अंगिकारले आहे. आनंदाचे जाहीर प्रदर्शन करीत बसण्यापेक्षा तो आनंद स्वतः अनुभवा आणि विनम्र राहा असा सल्ला येथील समाजशास्त्रज्ञ देतात. त्यामुळे फिनलँडमधील नागरिक आपल्या आनंदाचे प्रदर्शन करताना दिसत नाहीत. आनंदी आयुष्य म्हटल्यानंतर खूप अपेक्षा ठेवल्या जातात; त्या ऐवजी जे आहे त्यात आनंदी राहणे हा फिनलँडवासियांचा स्वभावधर्म बनलेला आहे. हेच त्यांच्या आनंदाचे खरे गुपित आहे, असे मत मानसशास्त्राचे फिनलँडमधील अभ्यासक Dr. Frank Martela यांनी नोंदवले आहे.

फिनलँडमध्ये नैसर्गिक प्रतिकूलता मोठ्या प्रमाणावर असल्याकारणाने त्या नैसर्गिक प्रतिकूलतेशी जुळवून घेत नागरिकांना जगावे लागते. ही प्रतिकूलता आपल्यासमवेत कायमच असणार आहे हे गृहित धरून त्या बाबत त्रागा करत जगण्यापेक्षा कोणत्याही परिस्थितीमध्ये आपण आनंदी कसे राहू शकू याचा विचार इथे प्राधान्याने केला जातो. त्यामुळे परिस्थिती कशीही असली तरीही आपण तिच्याकडे सकारात्मक दृष्टीने पाहायला हवे हे त्यांना आता उमगले आहे. क्षीण सूर्यप्रकाशापायी अंधाराचे प्राबल्य असणारे दिवस हा आपल्या रोजच्या जगण्याचा भाग आहे याचा स्वीकार येथील नागरिकांनी केला असल्याचे आढळून येते. रोजच्या जगण्याशी मनापासून जुळवून घेतले की त्या विषयीच्या तक्रारी कमी होतात आणि आपण आपोआपच आनंदी जीवन जगू लागतो, हेच फिनलँडमधील नागरिकांच्या आनंदी जगण्याचे खरे गुपित असावे, असा येथील अभ्यासकांचा तर्क आहे.

या विवेचनातून अधोरेखित होणारी महत्त्वाची बाब म्हणजे, व्यक्तिगत, कौटुंबिक आणि सामाजिक स्तरांवर तसेच जीवनव्यवहारांमध्ये एकंदरच व्यग्र असताना माणूस अधिकाधिक आनंदी, समाधानी आणि ताणमुक्त राहून त्याला जीवनाचा खरा आनंद कसा प्राप्त करता येईल यासाठी फिनलँडसारखा देश करीत असलेले प्रयत्न केवळ कौतुकास्पदच नाहीत तर अनुकरणीयसुद्धा आहेत. ■■

आर्थिक

# 'कोविड', टाळेबंदी आणि बांधकाम क्षेत्र

'कोविड'च्या संसर्गामुळे जर्जर झालेला वैश्विक समुदाय आताशा कोठे हळूहळू मूळपदावर येऊ पाहतो आहे. मात्र, परिस्थिती पूर्णपणे सुरळीत झालेली आहे, असे छातीठोकपणे म्हणण्याची सोय नाही. संसर्गाच्या दुस-या लाटेमुळे बसलेल्या चटक्यांमधून भारतीय समाज आणि भारतीय अर्थव्यवस्था मंदगतीने सावरताना दिसते. तरीही, 'कोविड'च्या संभाव्य तिस-या लाटेची तलवार सगळ्यांच्या डोक्यावर लटकते आहेच. या लाटा आज ना उद्या ओसरतील यांबाबत शंका कोणालाच नाही. किंबहुना, व्यापक प्रमाणावर लसीकरण साध्य झाल्यानंतर या संसर्गाचे भयकारी सावटही क्रमाने निवळायला लागेल, यांबाबतही वाद नाही. मात्र, २०१९ सालातील नोव्हेंबर महिन्यापासून कमी-अधिक प्रमाणात बाधक ठरत आलेल्या या संसर्गाने सर्वसामान्यांच्या जीवनसरणीवर घडवून आणलेले काही परिणाम कदाचित दीर्घकालीकही शाबीत होतील, अशी लक्षणे आज दिसायला लागलेली आहेत. विशेषतः, कामाचे स्वरूप, लोकसंपर्क, राहण्याच्या जागेची रचना व निवासी गरजा, कार्यालयीन कामकाज आणि निवास यांचे साहचर्य, त्यांतील बदलांचे रूप-स्वरूप...अशांसारख्या जीवनाच्या अंगांवर गेल्या दीडएक वर्षांमध्ये 'कोविड'पायी जाणवलेले परिणाम कदाचित चिरस्थायी अथवा दूरगामी शाबीत होतील.

'कोविड'पायी विस्कटलेल्या अर्थचक्राचा सर्वाधिक गंभीर आणि सघन असा प्रतिकूल परिणाम जाणवतो आहे तो अर्थव्यवस्थेतील मागणीवर. याचा संबंध आहे खालावलेल्या रोजगारचित्राशी. संघटित क्षेत्रामध्ये अनेक ठिकाणी अस्तित्त्वात आलेली घोषित-अघोषित वेतन कपात, शहरी असंघटित क्षेत्राची आणि मुख्यतः त्यातील स्वयंरोजगाराची झालेली पुरती वाताहत यांपायी अनेक समाजस्तरांतील क्रयशक्ती मलूल बनलेली दिसते. साहजिकच, खरेदीबाबत सावधगिरी बाळगली जात असल्याचे जाणवते. केवळ निकडीच्या जिनसांची खरेदी करण्याकडेच सर्वसामान्यांचा कल सध्या तरी दिसतो.



अवांतर आणि सद्यःस्थितीत टाळता येण्याजोग्या अथवा लांबणीवर टाकणे शक्य आहे अशा खर्चांकडे हात आखडता घेण्याची प्रवृत्ती जवळपास सर्वत्रच बलवत्तर आहे. अर्थकारणातील अनेक क्षेत्रांवर या प्रवृत्तिबदलाचे भलेबुरे परिणाम त्यांपायी आता जाणवू लागलेले आहेत.

बांधकाम व्यवसायाचे क्षेत्रही त्यास अपवाद नाही. निवासी घरे, व्यावसायिक गाळे, व्यापारी वापराची बांधकामे अशी जवळजवळ या व्यवसायातील सगळीच उपक्षेत्रे 'कोविड'च्या चपेटीमध्ये आलेली आहेत. किंबहुना, अर्थव्यवस्थेतील या एका क्षेत्राला 'कोविड'च्या संसर्गाचे बसलेले व आजही बसत असलेले तडाखे तुलनेने अधिक तीव्र आहेत, असेच म्हणणे भाग आहे. या अरिष्टाचे बांधकाम व्यवसायाला सोसावे लागणारे प्रतिकूल परिणाम तात्कालिक जसे आहेत तसेच ते दूरगामीही संभवतात. तात्कालिक परिणामांच्याबाबतीत सर्वाधिक तीव्र आणि तितकाच संवेदनशील पैलू म्हणजे बांधकामे चालू असलेल्या ठिकाणांवरील श्रमिक व अन्य मनुष्यबळाच्या आरोग्याची काळजी घेण्यासंदर्भातील. बांधकाम व्यवसायात रोजीरोटी कमाविणा-या मनुष्यबळातील हा सर्वाधिक 'व्हल्नरेबल' घटक ठरतो. टाळेबंदीपायी बांधकामांवर जारी करण्यात आलेले निर्बंध हा झाला यांतील दुसरा तितकाच गंभीर परिणाम. त्यांमुळे कामे बंदच पडली. साहजिकच, बांधकाम प्रकल्प पूर्ण होण्याचा कालावधी लांबत चालला. प्रकल्पांचे सगळे वेळापत्रकच पार विस्कटून गेले. अर्धवटावस्थेमध्ये प्रलंबित राहिलेल्या कामांमध्ये गुंतवलेले भांडवल अडकून बसले. या सगळ्यांपायी बांधकाम व्यावसायिकांना व्यवसायाद्वारे मिळणा-या परताव्याला चांगलीच कसर लागली. व्यावसायिकांनी उचललेल्या कर्जांची परतफेड त्यांमुळे रखडली. संबंधित बँका व अन्य वित्तीय संस्थांना त्याचा फटका बसावा हे मग ओघानेच आले.

बांधकामे ठप्प झाल्याने बांधकाम साहित्याला असलेल्या मागणीला उतरती भाजणी लागली. सीमेन्ट, पोलाद, विटा, रंग यांसारख्या उद्योगांना त्याची झळ बसली. या सगळ्या घसरणीचा सर्वाधिक प्रतिकूल परिणाम जाणवला तो बांधकाम क्षेत्रात रोजंदारी मिळवलेल्या स्थलांतरित मजुरांना. गावाकडे पावले फिरवण्यावाचून अन्य पर्यायच त्यांना मग उरला नाही.

**वेगवेगळे उपघटक, निरनिराळे परिणाम**

'कोविड'च्या संसर्गापायी जारी कराव्या लागलेल्या टाळेबंदीमुळे बांधकाम क्षेत्राच्या पुढ्यात अडचणींची मालिका उभी राहिली हे वास्तव असले तरी, बांधकाम व्यवसायाचे क्षेत्रही पुन्हा एकरस नाही याची जाणीव ठेवणे भाग पडते. संसर्गाचे आणि त्याला टाळेबंदीचे या क्षेत्रातील निरनिराळ्या उपघटकांवर घडून येत असलेले व या पूर्वी घडून आलेले परिणाम वेगवेगळे आहेत. 'कोविड'च्या फैलावाचा संभाव्य धोका आणि शक्यता गर्दीच्या प्रमाणाशी आणि पर्यायाने लोकसंख्येच्या घनतेशी निगडित आहे. त्यांमुळे, ज्या बांधकामांच्या अथवा वास्तूंच्या वापराचा थेट संबंध अधिक घनतेच्या लोकसंख्येशी, गर्दीशी जोडलेला आहे अशा बांधकामांना व त्यांच्याशी संबंधित बांधकाम व्यावसायिकांना 'कोविड'च्या संसर्गापायी होऊ शकणाऱ्या दूरगामी परिणामांचे चटके अधिक तीव्रतेने बसावेत, हे ओघानेच येते. चित्रपटगृहे, वसतिगृहे, अतिथीगृहे, हॉटेले, रेस्टॉरन्ट्स्, विश्रामगृहे, मॉल्स...यांसारख्या बांधकामांना असणारी मागणी भविष्यात काही वेगळा कल दर्शवू शकेल, असे मानण्यास आज जागा आहे. अलीकडील काही वर्षांत या गटातील बांधकामांना असणारी मागणी दरवर्षी जोमाने वाढत राहिलेली आहे. परंतु, निदान नजीकच्या भविष्यात तरी एकंदरच बांधकामांना मागणी किती व कशी असेल यांबद्दल बांधकाम क्षेत्रातील अभ्यासक व तज्ज्ञ सावध भूमिका घेताना दिसतात. खास करून, गर्दीचा संबंध येणाऱ्या आणि पर्यायाने संबंधित इमारतींचा लोकसंख्येच्या दृष्टीने अधिक सघन वापर होण्याच्या शक्यता असणाऱ्या बांधकाम क्षेत्रातील उपघटकांना येत्या काळात उतरत्या मागणीचा सामना करावा लागेल, असे निरीक्षण काही तज्ज्ञ नोंदवत आहेत.

'कोविड'च्या विषाणूंमध्ये घडून येत असलेल्या गुणसूत्रीय बदलांपायी येत्या काळात 'कोविड-१९'च्या चुलत-सावत्र भावंडांचा फेरा वैश्विक समुदायाकडे वळण्याच्या शक्यताही वैद्यकीय क्षेत्रातील काही घटक सुचवताना दिसतात. तसे खरोखरच घडेल किंवा कसे, यांबद्दल आजमितीस काहीच सांगता येणार नाही. परंतु, या सगळ्यामुळे वैश्विक समुदायाच्या जीवनशैलीत चिरंतन स्वरूपाचे काही बदल साकारण्याच्या शक्यता मात्र संभवतात.



उद्या खरोखरच तसे झाले तर, बांधकामे आणि इमारतींचे वास्तुरेखाटन व वास्तुरचना या संदर्भातील शासकीय मार्गदर्शक तत्वे, नियम, कायदेकानू यांत काही मूलभूत स्थित्यंतरे घडून येणे स्वाभाविक शाबीत होते. घरात राहूनच कार्यालयीन कामे उरकण्याचा पर्याय आता अनेक व्यवसाय क्षेत्रांमध्ये अवलंबण्यात येतो आहे. त्यांमुळे, एकीकडे कार्यालयीन बांधकामांच्या मागणीवर जसा प्रतिकूल परिणाम संभवतो त्याचप्रमाणे, घरकाम व कार्यालयीन काम यांचे संतुलन साधण्याच्या दृष्टीने निवासी घरांच्या रचनेमध्येही अनुरूप असे बदल यथावकाश साकारावेत. त्याच प्रकारचे काही बदल व्यावसायिक आणि कार्यालयीन वापरासाठीच्या इमारतींचे आरेखन व वास्तुरचना यांत घडून येतील. त्यासाठी आवश्यक ते नियमही आरोग्य मंत्रालय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांकडून जारी केले जाण्याची प्रक्रियाही वेग पकडेल.

कार्यालयीन उपस्थितीसंदर्भातील निर्बंध व मार्गदर्शक तत्वे भविष्यातही काही काळ आजच्या धर्तीवरच अंमलात राहिली तर कार्यालयांच्या वास्तुरेखाटणांसंदर्भातील नियमांवलीमध्ये बदल संभवतात. कार्यालयांचे आकारमान, कर्मचाऱ्यांची आसनव्यवस्था, व्यावसायिक गाळ्यांची अंतर्गत रचना, कार्यालयीन कामकाजासाठी वापरावयाचे क्षेत्र आणि मोकळी जागा यांचे परस्परप्रमाण, मुक्त क्षेत्रांचे आकारमान व वापर, कार्यालयांमध्ये एका वेळी कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांची घनता, दर कर्मचाऱ्यामागे आवश्यक असणाऱ्या क्षेत्रफळासंदर्भातील मार्गदर्शक तत्वे यांसारख्या बाबींशी संलग्न नियम व संकेत यांत दूरगामी स्वरूपाचे परिवर्तन घडून येण्याच्या शक्यता या क्षेत्रातील अभ्यासक आज वर्तवत आहेत.

जगभरातील बांधकाम व्यवसायाच्या क्षेत्रात संभवणारे हे बदल कमी-अधिक प्रमाणात भारतीय अर्थव्यवस्थेतील बांधकाम क्षेत्रातही आज ना उद्या डोकवतील असे मानणे अगदीच अ-तार्किक ठरणार नाही. त्याच वेळी, २०२० सालातील मार्च महिन्यापासून गेले सुमारे वर्ष - सवावर्ष प्रादुर्भाव जोरात असलेल्या 'कोविड-१९' च्या चटक्यांचे भारतीय बांधकाम क्षेत्रामध्ये आजवर जाणवलेले आणि येत्या काळात जाणवणारे संभाव्य पडसादही जाणून घेणे उद्बोधक ठरेल.

## अस्थिर माहौल आणि संमिश्र कल

देशी बांधकाम व्यवसायावर एक दृष्टिक्षेप टाकला तर प्रथमतः डोळ्यांत भरतो तिथे नांदणारा अस्थिरतेचा माहौल. परिणामी, बांधकामाशी संलग्न विविध बाबींच्या वाटचालीचे कलही संमिश्रच दिसतात. या क्षेत्रात आज दिसणा-या चित्राचे काही कंगोरे, म्हणूनच, अभ्यसनीय ठरतात.

**(१) बांधकाम खर्च आणि घरांच्या किमती :** 'कोविड-१९' पायी अर्थचक्र पुरते विस्कटलेले आहे. रोजगार तर चांगलाच हबकलेला दिसतो. असंघटित उद्योगव्यवसायांच्या क्षेत्राचा तर कणाच मोडलेला आहे. संघटित कॉर्पोरेट विश्वामध्ये कर्मचारी कपात, वेतनकपात यांचे सत्र चालूच आहे. परिणामी, उपजीविका आणि नजीकच्या भविष्यातील अर्थचित्र यांबाबत समाजाच्या अनेक क्षेत्रांमध्ये प्रचंड अनिश्चितता आहे. त्यांमुळे, निवासी घरांना असणा-या मागणीला कसर लागून किमती उतरती भाजणी दर्शवतील असा होरा व्यक्त केला गेला. प्रत्यक्षात मात्र चित्र उलटेच दिसावे. एक तर, अनेक बांधकाम प्रकल्प टाळेबंदीपायी रखडलेले आहेत. बांधकाम साहित्याचा तुटवडा जाणवतो आहेच. स्थलांतरित मजुरांनी घराकडे पावले वळविल्याने बांधकाम क्षेत्राला श्रमशक्तीच्या तुटवड्याचे मोठे संकट भेडसावते आहे. या सगळ्यांपायी होत असलेल्या विलंबामुळे प्रवर्तित केलेल्या बांधकाम प्रकल्पांचा खर्च मुळातच फुगत चाललेला आहे. घरांच्या बांधकाम खर्चातच वाढ होत असेल तर तिचे प्रतिबिंब घरांच्या अथवा गाळ्यांच्या बाजारभावांमध्ये पडणे अगदी स्वाभाविकच ठरते. तेव्हा, 'कोविड-१९' पायी घरे स्वस्त होतील अथवा व्हावीत या अपेक्षेची पूर्तता होणे अवघडच शाबीत व्हावे.

**(२) शासनाकडून आधाराचा टेकू :** बांधकाम क्षेत्राच्या कामगिरीवर रोजगारनिर्मिती, भांडवली गुंतवणूक, सीमेन्ट, पोलाद, अन्य प्रकारचे बांधकाम साहित्य अशा विविध अर्थघटकांचे अर्थकारण निर्भर असते. त्यांमुळे, 'कोविड-१९' पायी खचलेल्या बांधकाम व्यवसायाला मागणीच्या आधाराचा टेकू पुरविण्यासाठी सरकारही प्रयत्नशील आहेच. व्याजदरांमध्ये कपातीस पूरक परिस्थिती निर्माण करणे, घरखरेदीदारांना मिळकत करासंदर्भात सवलती जाहीर करणे यांसारखे उपाय शासनाने अवलंबलेले आहेत. शासन उचलत असलेल्या या पावलांचे अपेक्षित परिणाम दिसावेत अशी अपेक्षा आहे.



**(३) नवीन प्रकल्पांचे प्रवर्तन लांबणीवर :** बांधकाम व्यवसायाला बँकिंग क्षेत्राकडून केला जाणारा भांडवल पुरवठा नवीन बांधकाम प्रकल्पांच्या प्रवर्तनाकडे वळविण्यापेक्षाही 'कोविड १९' पायी अर्धवट रखडलेल्या कामांच्या पूर्ततेकडे वळवण्यावर व्यावसायिकांचा सध्या मुख्य भर आहे. परिणामी, नवीन प्रकल्पांचे प्रवर्तन काही काळ लांबणीवर पडावे हे स्वाभाविक ठरते. त्यांमुळे, बांधकामाच्या बाजारपेठेमधील मागणी व पुरवठ्याच्या समीकरणात मध्यम मुदतीदरम्यान काही काळ विस्कळीतपणा जाणवावा.

**(४) ताबा मिळण्यास विलंब :** 'कोविड १९' पायी टाळेबंदी जारी झाल्याने गृहनिर्माण प्रकल्पांची कामे ठप्प झाली. साहजिकच, सदनिकांचा प्रत्यक्ष ताबा ग्राहकांना मिळण्याचे वेळापत्रकही कोलमडले. घरांचा ताबा मिळण्यासाठी ताटकळत बसण्याखेरीज ग्राहकांना निदान काही काळ तरी अन्य काही पर्याय दिसत नाही.

**(५) बांधकामांचा वेग मंदावला :** प्रदीर्घ काळ टाळेबंदी जारी करावी लागल्याने शहरी विभागांतील स्थलांतरित श्रमिकांवर गंडांतर ओढवले. गावांकडे पावले पुन्हा वळविण्याखेरीज त्यांना गत्यंतरच नव्हते. शहरी बांधकाम क्षेत्र हे बव्हंशी अवलंबून आहे ते अशा स्थलांतरित असंघटित श्रमिकांच्या योगदानावरच. ही श्रमशक्तीच खेडोपाडी परतून गेल्याने बांधकाम क्षेत्राला मनुष्यबळाच्या तुटवड्याचा सामना करणे भाग पडले. श्रमशक्तीच्या तुटवड्यापायी बांधकामे रेंगाळली. त्यांमुळे ग्राहक आणि बांधकाम व्यावसायिक हे दोन्हीही घटक अडचणीत आले. सदनिकांचा ताबा मिळण्यासाठी प्रतीक्षा करणे भाग पडले ग्राहकांना तर, बांधकामे रेंगाळल्याने स्थिर खर्चाचा बोजा वाढण्याबरोबरच खेळत्या भांडवलाचे सारे चक्र मोडीत निघाल्याने मेटाकुटीस आले बांधकाम व्यावसायिक.

**(६) घरांच्या मागणीत वाढ संभाव्य :** 'कोविड १९' पायी निदान नजीकच्या भविष्यातील तरी सगळेच चित्र पार निराशाजनक राहील असेही मानण्याचे कारण नाही, याचेही काही संकेत मिळत असल्याचे व्यावसायिकांचे अनुभव आहेत. संसर्गाच्या भीतीपायी राहत्या घरातूनच कार्यालयीन कामकाज उरकण्याची सुविधा प्रगत तंत्रज्ञानाद्वार उपलब्ध झाली आणि नोकरदारांच्या लेखी घराचे महत्व अचानक वाढले. ***(कृपया पृष्ठ क्रमांक २९ पाहावे)***

जिकडे-तिकडे

# गूढरम्य आठवा खंड

जगामध्ये सातच खंड आहेत अशी धारणा दृढपणे प्रस्थापित असतानाच्या पर्वातदेखील आणखी एक आठवा खंड निश्चितपणाने आहे असे मानून संशोधन करणारी संशोधकांची एक फौज अवितर संशोधनरत होती. हा आठवा खंड शोधण्यासाठी थोडाथोडके नव्हे तर ३७५ वर्षांहून अधिक काळ प्रयत्न चालू आहेत. परंतु, आठवा खंड नक्की अस्तित्वात आहे या वर संशोधकांचे एकमत आता मात्र होऊ लागले आहे. या आठव्या खंडाविषयीचे गूढ आजही अनेकांना स्वस्थ बसू देत नाही.

पृथ्वीवरील या आठव्या खंडाचा शोध घेण्याचा पहिला प्रयत्न झाला तो १६०४ साली. Abel Tasman या डच नाविकाने पहिल्यांदा टास्मानिया, न्यूझीलंड, टोंगा आणि फिजी या द्वीपांचा शोध घेतला. या सगळ्यांच्या जोडीला दक्षिण गोलार्धामध्ये एक विस्तृत खंड अस्तित्वात आहे अशी त्याला सुरुवातीपासून खातरी होती म्हणून त्याच्या शोधात तो सामुद्री मोहिमेवर निघाला होता. बहुतांश युरोपियांसाठी त्या काळी दक्षिण गोलार्धातील हा भाग गूढ होता. बव्हंश भाग पाण्याने वेढलेला असला तरीही इथे जमिनीचा मोठा खंड अस्तित्वात असणार अशी अनेकांची तेव्हापासून धारणा होती. या भागाला त्या काळी Terra Australis असे नाव देण्यात आलेले होते. इंडोनेशियातील जकार्ता येथील तळावरून दोन जहाजे घेऊन Abel Tasman या मोहिमेवर निघाला. Maori जमातीचे लोक त्याला वाटेत भेटले. त्यांच्याशी तिथे मोठा संघर्ष झाला व काही युरोपीय खलाशी त्यामध्ये मारले गेले. त्यामुळे ही मोहिम अर्धवट राहिली. तेव्हापासून या ठिकाणाला Moordenaers Bay अर्थात 'खुनशी उपसागर' असे नाव देण्यात आले. ही शोधमोहिम म्हणजे, दक्षिणेकडचा एक मोठा उपखंड ज्ञात होण्याच्या दिशेने एक नांदी होती. परंतु, ही शोधमोहिम पुढे गेली नाही. तिथे घडलेल्या हिंसाचारामुळे Abel Tasman या दर्यावीरसुद्धा पुन्हा तिथे गेला नाही. त्या नंतर मध्ये शेकडो वर्षांचा काळ गेला आणि अखेरीस अलीकडे २०१७ साली Zealandia या नव्या खंडाचा शोध लागला असल्याचे भूगर्भशास्त्रज्ञांनी घोषित केले.

नव्याने शोधलेला हा खंड ४९ लाख चौरस किलोमीटर इतक्या विशाल क्षेत्रफळाचा आहे, ही बाब जगासमोर आली. तोपर्यंत, सर्व विश्वकोश, नकाशे, 'सर्च-



इंजिन' या सर्व ठिकाणी पृथ्वीच्या पाठीवर सात खंड असल्याची नोंद होती. परंतु, हा आठवा खंड शोधण्यात यश मिळाल्याने सगळे संदर्भ बदलून गेले. Zealandia हा नव्याने शोधलेला भूभाग जगातील सर्वांत लहान, सर्वांत निमूळता आणि सर्वांत तरुण खंड असल्याचा दावा संशोधकांनी केला. यात संशोधकांच्या पुढ्यातील सर्वांत मोठे आव्हान एकच होते की या भूखंडाचा तब्बल ९४ टक्के भूभाग हा अजूनही पाण्याखाली आहे. न्यूझीलंडसारखी काही मोजकीच बेटे समुद्रसपाटीपासून वर असल्याने आजवर हा भूभाग तसा दृष्टीस पडलेला नाही आणि त्यामुळेच या भूभागाविषयी आजही अनेकांना गूढ आहे. हा भूभाग पाण्याखाली सुमारे दोन किलोमीटर इतक्या खोलीवर असल्याने पूर्वी या भूभागावर कोण राहत होते, या खंडाची निर्मिती कशी झाली, हा खंड पाण्याखाली किती काळापासून आहे या आणि अशा अनेक गोष्टी अद्यापही शास्त्रज्ञांना अज्ञात आहेत.

Abel Tasman यांच्या प्रयत्नांनंतर बराच काळ मोहिम पुढे कार्यान्वित झाली नाही. त्या नंतर पुढे शतकभराने ब्रिटिश नकाशाकार जेम्स कुक यांना दक्षिण गोलार्धाच्या सफरीवर पाठवण्यात आले. वरकरणी त्या मोहिमेचा हेतू पृथ्वीपासून सूर्याचे अंतर किती आहे हे शोधण्याचा होता. मात्र, प्रत्यक्षात दक्षिणेकडील खंड शोधण्याचे काम कुक यांच्यावर सोपवण्यात आले होते. ही मोहिम मुद्दामूनच गुप्त ठेवण्यात आलेली होती. परंतु, त्यांच्याकडून काही ठोस माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. पुढे स्कॉटिश पर्यावरणवादी जेम्स हेक्टर यांनी जेव्हा १८९५ साली सागरी मोहिम आखली तेव्हा Zealandia च्या अस्तित्वाचे पुरावे गोळा केले. हे पाऊल अतिशय महत्त्वाचे मानले गेले. हेक्टर यांनी अभ्यासानंतर असा निष्कर्ष काढला की आज आपल्याला दिसणारा न्यूझीलंड म्हणजे त्या विस्तीर्ण भूभागाचे केवळ शिखर आहे. प्रत्यक्षातील प्रचंड मोठा भूभाग हा पाण्याखाली गेलेला आहे. त्यामुळे न्यूझीलंडशी जोडलेला एक मोठा भूभाग आहे आणि तो दक्षिणेकडून पूर्वेकडे गेलेला आहे त्यांनी केलेल्या या संशोधनाविषयी खूप चिकित्सा होऊनही नंतर बराच काळ या संदर्भातील संशोधन पुढे गेले नाही.

एखाद्या खंडाचा शोध घेणे हे जितके अवघड तितकेच ते खर्चिकही असते. ती बाब निकडीची आहे असे वाटत नसल्याने त्यासाठी आवश्यक असणारी आर्थिक तरतूद करण्यामध्ये विलंब होत राहतो आणि अशी मोहीम मागे पडत जाते. आठव्या खंडाच्या शोधाबाबतही नेमके हेच झाले. त्यामुळे दरम्यानच्या मोठ्या काळात संशोधन

रेंगाळले. मात्र, एक गोष्ट झाली ती म्हणजे, १९९५ साली अमेरिकी भूभौतिकशास्त्रज्ञ Bruce Peter Luyendyk यांनी या प्रदेशाचे वर्णन करताना त्याचा पुनःश्च एकदा ‘खंड’ असाच उल्लेख केला आणि हा विषय नव्याने ऐरणीवर आला. दरम्यानच्या काळामध्ये संयुक्त राष्ट्रांनी सागरी कायद्यांसदर्भातील सुधारित नियम जाहीर केले आणि नवीन खंडाच्या शोधाला प्रोत्साहन मिळण्याच्या दृष्टीने आशा पल्लवित झाल्या. आपल्या किना-यापासून ३५० किलोमीटरच्या प्रदेशापर्यंत सागरी अंतरादरम्यान असणा-या समुद्री प्रदेशावर विस्तारित प्रदेश म्हणून ते ते देश दावा करू शकतात आणि तेथील साधनसंपत्ती, खनिज साठे व तेल यावरही त्या देशांना हक्क सांगता येईल असा एक सुधारित नियम अस्तित्वात आला. त्यामुळे या नव्या खंडाचा शोध घेण्यासाठी संशोधकांनी पुन्हा प्रयत्न सुरू करायचे ठरवले.

न्यूझीलंड हा देश जर एका मोठ्या खंडाचा भाग आहे हे सिद्ध झाले तर या देशाचा भूभाग सहा पटींनी वाढू शकेल हे लक्षात घेऊन नव्या खंडाच्या शोधाची मोहिम पुन्हा हाती घेण्याचे निश्चित झाले. त्यासाठी विशेष आर्थिक तरतूद करण्यात आली. सरकारचे पाठबळ मिळाले. आत्तापर्यंतच्या शोधमोहिमांतून जे पुरावे समोर आलेले होते त्यांचा नव्याने अभ्यास सुरू करण्यात आला. पूर्वीच्या मोहिमांच्या तुलनेत आता आधुनिक तंत्रज्ञानही एव्हाना चांगल्या रीतीने विकसित झालेले होते. त्यामुळे या भूभागाचे अस्तित्व शोधण्यासाठी उपग्रहीय तंत्रज्ञानाची मदत घेण्यात आली आणि त्या द्वारे या भूभागाच्या अस्तित्वाचे आणखी काही पुरावे समोर आले. जवळपास ऑस्ट्रेलियाच्या आकारमानाइतकाच तो भूभाग असल्याचे उपग्रहाच्या माहितीवरून स्पष्ट झाले. आठवा खंड असल्याच्या दाव्याला या माहितीमुळे पुष्टी मिळाली आणि शोधाचे एक नवेच द्वार खुले झाले. संशोधकांनी पुन्हा एकदा कंबर कसली आणि या संशोधनात नव्याने भर घालण्यास सुरुवात केली.

प्राचीन गोंडवाना या महाखंडाचा सुमारे ५५ कोटी वर्षांपूर्वी असलेला एक भाग म्हणजे Zealandia हा आताचा खंड. दक्षिण गोलार्धातील बहुतांश जमीन गोंडवानामध्ये सामावलेली होती. परंतु सुमारे दहा कोटी वर्षांपूर्वी काही लक्षणीय असे बदल झाले आणि त्यामुळे Zealandiaचा भूखंड वेगळा झाला. मात्र, हे भूगर्भीय बदल नक्की कशामुळे आणि काय झाले या विषयीचा उलगडा मात्र अद्यापही झालेला नाही. त्या विषयी अधिक संशोधन व्हावे लागणार आहे. कालांतराने हा खंड समुद्राखाली गेला आणि पुढे हळूहळू तो पाण्याखाली लुप्त झाला. त्यामुळे हा खंड कधी काळी



अस्तित्वात होता हे वास्तवच काळाच्या उदरात अप्रगट राहिले. पाण्यात बुडालेला असतानाही त्यावरील दगडांच्या नमुन्यामुळे भूगर्भशास्त्रज्ञांना समुद्राखाली असलेल्या त्या खंडाचा शोध लावणे शक्य झाले. कारण महासागराचा तळ हा बॅसॉल्टसारख्या अग्निजन्य पदार्थांनी बनलेला असतो तर खंडीय कवच हे सर्वसाधारणपणाने अग्निजन्य, रूपांतरित व गाळजन्य अशा तीनही प्रकारांचे असते. संशोधकांना सापडलेले हे दगड या प्रकारातील असल्याने समुद्राखाली हा खंड दडलेला असावा अशी शक्यता संशोधकांच्या ध्यानात आली. त्यामुळेच त्याचा शोध घेण्यात त्यांना अंतिमतः आता यश आले.

न्यूझीलंडच्या ‘क्राऊन रिसर्च इन्स्टिट्यूट’मधील संशोधक Andy Tulloch यांचा Zealandiaचा शोध लावणा-या चमूमध्ये सहभाग होता. यांच्या मते, काही गोष्टी उघड असूनही त्यांचा प्रत्यक्ष शोध लागायला वेळ जातो. तसेच काहीसे या आठव्या खंडाच्याबाबतीत घडल्याचे दिसून येते. त्यातून हा खंड बहुतांशी पाण्याखाली असल्याकारणाने त्याचा शोध घेत पुढे जाण्यासाठी संशोधकांना बराच कालावधी लागला. या नव्या खंडाचा शोध लागलेला असला तरी आजही अनेक गोष्टी उलगडलेल्या नाहीत. हा खंड इतका लहान असतानादेखील अखंड कसा राहिला असावा, हा खंड पाण्याखाली नक्की केव्हा गेला असावा, कधी काळी हा खंड कोरडा प्रदेश म्हणून अस्तित्वात होता का आणि असल्यास किती काळासाठी होता यासारख्या प्रश्नांची उत्तरे मात्र अद्यापही मिळालेली नाहीत आणि त्यांचे गूढ कायमच आहे. जर हा प्रदेश कधी काळी कोरडा असेल तर तिथे कुणी त्या काळी राहत होते का याचेही उत्तर अद्याप सापडलेले नाही. या खंडावर पूर्वी कोणत्या प्रजाती होत्या आणि त्यांचे नेमके स्वरूप काय होते. यांचेही उत्तर अद्याप संशोधकांना प्राप्त झालेले नाही. Zealandiaचा काही भाग कोट्यवधी वर्षांपूर्वी निश्चितपणे समुद्राच्या वर असावा असा अनेक भूगर्भशास्त्रज्ञांचा कयास आहे. अलीकडच्या काळात लागलेला हा आठव्या खंडाचा शोध महत्त्वाचा मानला जातो. हा खंड समुद्रामध्ये दोन किलोमीटर खोलीवर असल्याने तिथे जाऊन शोध घेणे मात्र आजच्या घडीला खूपच आव्हानात्मक ठरते आहे. त्यासाठी खूप मोठ्या प्रमाणावर आर्थिक तरतूद, सरकारचे पाठबळ आणि अद्ययावत साधनसामुग्रीची गरज लागणार आहे. तूर्तास या खंडाच्या अस्तित्वावर शिक्कामोर्तब झाल्याने अनेक अज्ञात गोष्टींची उकल होण्याच्या आशा पल्लवित झाल्या आहेत, एवढे मात्र खरे. ■■

*(पृष्ठ क्रमांक २४ वरून)*

भाडेतत्वावरील सदनिकांपेक्षा स्वतःच्या मालकीचे घर असणे, अनेकांना अधिक श्रेयस्कर वाटू लागले. मुळात, 'कोविड १९' पायी नोक-यांसंदर्भातील अस्थिरता व अनिश्चितता वाढू लागल्याने, न जाणो उद्या उत्पन्न घटले तर घरभाडे देणे परवडेल किंवा नाही, ही आशंका अनेकांना घेरू लागली. दुसरीकडे, घरखरेदीस प्रोत्साहन देण्यासाठी करसवलतींपासून ते सवलतीच्या व्याजदरांपर्यंत सरकारनेही विविध पावले उचलली. या सगळ्याचा एकत्रित परिणाम होऊ न भाडेतत्वावर राहण्यापेक्षा स्वतःचे घर असणे अधिक हितकर असे वाटून येत्या काळात निवासी सदनिकांना असणारी मागणी वाढू शकेल अथवा शकते असा सकारात्मक अदमास या क्षेत्रातील काही जाणकार व्यक्त करतात. सदनिकांच्या सर्वच प्रकारांत ही संभाव्य वाढ सारख्याच प्रकारे घडून येईल, असे मात्र नाही. मोठ्या क्षेत्रफळाच्या निवासी सदनिकांना असणा-या मागणीमध्ये कदाचित अधिक भरीव मागणी संभवते. घरातील एखादी खोली कार्यालयीन कामासाठी राखीव ठेवणे सुलभ व्हावे, ही भूमिका अशा मागणीच्या मुळाशी बलवत्तर असू शकेल.

बांधकाम व्यवसायातील या उभरत्या बदलांचे परिणाम नजीकच्या भविष्यापेक्षाही मध्यम मुदतीमध्ये अधिक स्पष्टपणे पृष्ठभागावर प्रतीत होतील, अशी शक्यता या क्षेत्रातील जाणकार निरीक्षक व्यक्त करतात. ■■

---

**संदर्भ :**

(1) https://www.thehindu.com/news/international/coronavirus-how-china-is-controlling-covid-19/article33201851.ece
(2) https://www.thehindu.com/news/international/coronavirus-how-china-is-controlling-covid-19/article33201851.ece
(3) https://www.forbes.com/sites/heikkivaananen/2020/05/26/what-makes-finland-the-happiest-country-in-the-world/
(4) https://www.bbc.com/future/article/20210205-the-last-secrets-of-the-worlds-lost-continent
(5) mckinsey.com/commercial-real-estate-must-do-more-than-merely-adapt-to-coronavirus/. (6) housing.com/news/how-covid-19-will-change-indias-housing-market/ ■■



## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

### अर्थबोधपत्रिका मासिक : वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **फक्त २०० / - रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **फक्त ३५०/ - रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **फक्त ५००/ - रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **फक्त ८०० /- रुपये** |

नियतकालिकांच्या मालकी हक्क व इतर तपशीलाबाबत फेब्रुवारीनंतर प्रसिद्ध होणा-या पहिल्या अंकामध्ये प्रसिद्ध करावयाचे प्रगटन, नियतकालिकांच्या रजिस्ट्रेशनबाबत केंद्र सरकारच्या १९५६ मधील नियम (क्रमांक ८)नुसार फॉर्म ४

| | |
|---|---|
| (१) नियतकालिकाचे नाव : | 'अर्थबोधपत्रिका' |
| (२) प्रकाशनस्थळ : | 'अर्थबोध,' ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६ |
| (३) नियतकालिकाचे स्वरूप : | मासिक |
| (४) प्रकाशकाचे नाव : | व्ही. एस. चित्रे |
| राष्ट्रीयत्व : | भारतीय |
| पत्ता : | 'अर्थबोध,' ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६ |
| (५) मुद्रकाचे नाव : | व्ही. एस. चित्रे |
| राष्ट्रीयत्व : | भारतीय |
| पत्ता : | 'अर्थबोध,' ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६ |
| (६) संपादकांचे नाव : | अभय टिळक |
| राष्ट्रीयत्व : | भारतीय |
| पत्ता : | 'अर्थबोध,' ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६ |
| (७) मुद्रणस्थळ : | एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवारपेठ, पुणे - ४११०३० |
| (८) नियतकालिकाच्या मालकांचे किंवा एकूण भांडवलापैकी एक टक्क्यांहून अधिक भाग धारण करणा-या भागधारकांची नावे व पत्ते : | 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) 'अर्थबोध,' ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ०१६ |

मी, व्ही. एस. चित्रे याद्वारे प्रमाणित करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आहे.

व्ही. एस. चित्रे

दिनांक - १ मार्च २०२१ (प्रकाशकाची सही)



RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Published and Posted at Model Colony Post Office Pune,
on 10th of each month

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**